## नियमित दिवाणी दावा क. ५०/२०१९ मधील नि.क्र.६० वरील आदेश

प्रस्तुत अर्ज प्रतिवादीच्या वतीने त्याच्या लेखी निवेदनात दुरूस्तीसाठी केला आहे. वादीच्या वतीने सदर अर्जावर पाठीमागील बाजूस म्हणणे दाखल करून अर्जास विरोध दाखविलेला आहे. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले.

२. खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे:-

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | लेखी निवेदनात प्रस्तावित दुरूस्तीस परवानगी देणे योग्य आहे का? | होय. |
| २. | आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्र.१ व २:-**

३. वादीने प्रस्तुत दावा हा दावा मिळकतीची वाटणी व स्वतंत्र कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीच्या वतीने प्रस्तुत दाव्यास म्हणणे नि.क्र.१६ वर दाखल केल्यानंतर दाव्यामध्ये मुद्दे कायम करण्यात आलेले आहेत व त्यानंतर वादीच्या वतीने नि.क्र.२५ वर पुराव्याकामी शपथपत्र देउन त्यावर उलटतपास प्रलंबीत असतांना प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीच्या वतीने दाखल करण्यात आला आहे.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ हा दाव्यातील पक्षकाराना त्यांचा दावा किंवा कैफियत न्यायालय ठरवेल त्यानुसार परवानगीची संधी देणे असा आहे. दुस-या बाजुचे अपरिमीत नुकसान होत नसेल किंवा त्यांच्यावर गंभीर अन्याय होत नसेल तर दुरूस्ती मान्य करायला न्यायालयास मुभा आहे जर दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरूपात काही बदल होणार नसेल तर दुरूस्ती मान्य करता येते.

५. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादीने लेखी निवेदनास परिच्छेद ३६ नंतर अर्ज परिच्छेद क्र.१ मधील नियोजित मजकूर “That the claim of the plaintiff is not within limitation as per law and this court have no jurisdiction to decide the revenue entries are vide-ab-initio hence, the suit is not tenable”. हा मजकूर

३६-A मध्ये दुरूस्तीअंती समाविष्ट करावयाचे असल्याचे प्रतिवादीचे कथन आहे.

६. वादीने मागीतलेली प्रस्तावित दुरूस्ती ही कायदेशीर मुद्दयाशी निगडीत आहे व न्यायालयाचे अधिकार क्षेत्र व मुदतीअनुषंगेचा कायदेशीर बचाव प्रतिवादी हा त्याच्या कैफीयतीमध्ये दुरूस्तीअन्वये समाविष्ट करू इच्छीत असल्याचे दिसून येते. सदर बाब ही कायद्याच्या मुद्दयाशी निगडीत आहे. प्रतिवादी इतर कोणतीही वस्तुस्थिती (fact) दुरूस्तीअन्वये समाविष्ट करीत असल्याचे दिसत नाही. सदर दुरूस्ती ही आश्चर्यकारक अशी नाही अथवा विरोधाभाषी दुरूस्ती ही प्रतिवादीने मागीतलेली नाही. अर्जातील प्रस्तुत दुरुस्तीच्या अनुषंगेचा मजकुर हा दाव्याच्या न्यायनिकालासाठी समाविष्ट करणे योग्य ठरणार आहे. सदर दुरूस्तीमुळे प्रतिवादीच्या बचावात अथवा दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही आमुलाग्र असा बदल होत नाही अथवा वादीचे अपरिमीत हानी होईल असेही दिसुन येत नाही. दुसरे म्हणजे वादीच्या वतीने पुराव्याचे शपथपत्र जरी दाखल करण्यात आले असले तरी, वादी साक्षीदाराचा उलटतपास अद्याप पूर्ण झालेला नाही. अशा स्थितीत दावा सकारात्मक रित्या पुराव्यासाठी प्रलंबीत आहे, असे म्हणणे सोयीचे होणार नाही. या ठिकाणी हे नमुद करावे लागेल की, प्रतिवादीने सदर बाब त्याचे कैफियत दाखल करतांना अभिलेखावर आणणे गरजेचे होते, असे असले तरी, अर्जातील प्रस्तावित दुरूस्तीचा विचार करता प्रतिवादीला विनंतीनुसार प्रस्तावित दुरूस्ती करण्यास परवानगी देणे योग्य होईल. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. प्रतिवादीचा नि.क्र.६० वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादीस लेखी कैफीयतीमध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. सदरची दुरुस्ती प्रतिवादीने विहित मुदतीत करावी व दुरुस्ती प्रत सादर करावी.

स्वा/-

दिनांक:- ०८.०५.२०२४

**(शरद ना. गवळी)**
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), रिसोड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same word to word, as per the original **Order.**

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Prashant K. More, **(Grade III)** |
| Name of court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Risod. |
| Date | : | 08.05.2024 |
| Order signed by the Presiding Officer | : | 08.05.2024 |
| **Order uploaded on** | **:** | **08.05.2024** |